पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 19/03/2020 (गुरूवार)
(सकाळ)

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावर सालई माहुली ता. पारशिरवनी जि. नागपूर येथे दि. 17/03/2020 चे 19.00 वा. ते 19.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– आशीष रामदास बुरडे, वय 32 वर्षे, रा. सालई माहुली, जि. नागपुर हा गावातील चौकात उभा असतांना आरोपी नामे– क्र. 1) राजेश रामदास चवरे, वय 35 वर्ष, 2) सतीश हिरलाल बरवे, वय 25 वर्ष व निखील हिरलाल बरवे तिन्ही रा. माहुली, जि. नागपूर हे मोटरसायकलने तेथे आले. यानंतर आरोपीने फिर्यादी सोबत काही वेळापुर्वी झालेल्या भांडणाचे कारणावरून वाद घातला. तसेच आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीला चाकु सारख्या धारदार शस्त्राने पोटावर, छातीचे खाली व लोखंडी रॉडने मांडीवर मारहाण करून गंभीर जखमी केले. तसेच आरोपीने फिर्यादीला जिवानिशी ठार करण्याचा प्रयत्न केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 307, 34 भादवी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. 1 व 2 ला अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास परिपोलिस उपनिरीक्षक श्री पळनाटे 7387086178 हे करीत आहेत.

## चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर तारसा मौदा येथे दिनांक 17/03/2020 चे 20.14 वा. दरम्यान फिर्यादी नामे– देवा हरीदास गायधने, वय 36 वर्ष, रा. तारसा, त. मौदा कामावर गेले होते. दरम्यान फिर्यादीच्या पत्नीने विवो कंपनीचा मोबाइल कि. 10,999/–रू. घरातील बेडरूमवर चार्जिंगला लावुन त्या आंघोळीला गेल्या होत्या. दरम्यान अज्ञात आरोपीने मोबाईल व कपाटामधील नगदी 22,000/–रू. असा एकुण 32,999/–रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार देशमुख हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 05 कि.मी. अंतरावरील माथनी टोल नाका जवळ मौदा येथे दिनांक 18/03/2020 चे 01:30 वा. ते 02.00 वा. दरम्यान कारूलाल पालेवार (मृतक) यांच्या मुलीची प्रकृती बरी नसल्याने फिर्यादी नामे– संतोष बाळकृष्ण पसिने, वय 37 वर्ष, रा. देवलगाव ता. लांजी, जि. बालाघाट, मध्यप्रदेश हा नागपुरला दवाखान्यात दाखवीण्याकरीता जात असतांना एमएच– 04/इएच– 6434 क्रमांकाची स्कॉरपीयो गाडी मध्ये 1) कारूलाल गोपाल पालेवार, 2) सौ. सुनिता कारूलाल पालेवार, 3) दिष्टी कारूलाल पालेवार, 4) संदिप पंधरे व 5) शैलेश किर्ती आणि फिर्यादी हे दहेगाव वरून नागपुर कडे जात होते. दरम्यान गाडीतील चालक आरोपी नामे– तुषार निमजे, वय 34 वर्ष, रा. लांजी, जि. बालाघाट याने स्कॉरपीयो गाडी भरगाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवुन समोरून येणाऱ्या अज्ञान वाहनाला धडक दिली. त्यामुळे फिर्यादी हा दिष्टीला घेउन गाडीच्या खाली उतरला व कारूलाल व त्याची पत्नी गाडीत फसले होते. बाकींना मार लागुन जखमी झाले तेव्हा ॲम्बुलन्सनी जखमींना उपचाराकरीता नागपुर मेडीकल येथे नेले असता कारूलाल गोपाल पालेवार, वय 42 वर्ष व त्यांची पत्नी सौ सुनीता कारूलाल पालेवार, वय 35 वर्ष, रा. दहेगाव, ता. लांजी, जि. बालाघाट, मध्यप्रदेश या दोघांना डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री मंगेश काळे हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 22 कि.मी. अंतरावरील मौजा उखळी शिवार येथे दिनांक 17/03/2020 चे 23:00 वा. दरम्यान फिर्यादीचा भाऊ विश्वास शंकर मेश्राम, वय 19 वर्ष, रा. ताडगाव पोस्ट मंगरूड त. समुद्रपुर व मामेभाऊ अनिकेत चंद्रमनी ढोके हे दोघेही मोटरसायकलने ताडगाव वरून भिसी मार्गे जात असतांना उखळी शिवारात रोडवरून मोटरसायकल स्लीप झाल्याने दोघे शेतामधील धुऱ्यावर पडले. या अपघातात विश्वास मेश्राम हा स्वतःचे मरणास कारणीभूत ठरला. तर अनिकेत हा जखमी झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– बादल शंकर मेश्राम, वय 21 वर्ष, रा. ताडगाव पो. मंगरूड त. समुद्रपूर जि. वर्धा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 3/181 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार यादव हे करीत आहे.

## विनयभंग

1) पो.स्टे. बोरी :– दिनांक 18/03/2020 चे 08.15 वा. दरम्यान 21 वर्षीय फिर्यादी/पीडित व आरोपी नामे– गणेश शामराव शेलार, रा. औरंगाबाद या दोघांचा दिड वर्षापासुन प्रेमसंबंध होते. त्या दोघांचा ब्रेकअप झाल्याने फिर्यादी नौकरी करीत असलेल्या ठिकाणी इतर मुला सोबत बोललेले आरोपीला पटत नव्हते. आरोपीने फोन करून 'तुने मुझे छोडा तो मे तुझे जिने नही दुंगा' असे म्हणुन त्रास देत होता. घटना ता वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करून हातबुक्कीने मारहाण करून तिचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 354(ड), 323, 504, 506 भादंवी. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि वर्षा मते या करीत आहे.

2) पो.स्टे. बेला :– दिनांक 17/03/2020 चे 23.00 वा. ते 23.30 वा. दरम्यान 16 वर्षीय फिर्यादी/पीडित हि घरी हजर असतांना 17 वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालक, रा. सिर्सी याने तिच्या घरी अनाधिकृतपणे प्रवेश केले. यानंतर ती बेडरूम मध्ये झोपली असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम 452, 354(ब) भादंवी. सहकलम 8 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री शिवाजी भांडवलकर हे करीत आहे.

3) पो.स्टे. खापा :– दिनांक 17/03/2020 चे 10.00 वा. दरम्यान फिर्यादी यांची 9 वर्षीय मुलगी/पीडित हि शेजारी टिव्ही पाहण्याकरीता गेली असता आरोपी नामे– समीर माधव राजुरे, वय 30 वर्ष, रा. बिछवा, ता. सावनेर हा सुद्धा टिव्ही पाहण्याकरीता गेला. यानंतर आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 354(ब)(ड)(4) भादंवी. सहकलम 11(1)(4) 12 बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि रासकर 9082196080 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर